महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग
शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अंबरनाथ, जि.ठाणे प
जुना भेंडी पाडा, कल्याण-बदलापूर रोड, अंबरनाथ, जि.ठाणे-421501.
www.itiambernath.gov.inE-Mail-iti0073ambernath@gmail.comPhone-(0251) 2610395.

जा.क्र.औप्रसंअं/आस्था/२०२३/३३३८ दिनांक :- २८/११/२०२३

प्रति,
सर्व शासकीय/अशासकीय
प्रशिक्षण केंद्र/ संस्था

विषय- पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, उच्च माध्यमिक अभ्यासक्रम तसेच व्दिलक्षी अभ्यासक्रमातर्गत शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजित करणेकरीता निविदा मिळणेबाबत.

संदर्भ-प्रादेशिक कार्यालयाचे पत्र क्र प्राकामुं/का-५ (अ)/व्यशियो/अशा/२०२३/ ५४०९, दिनांक ०९/११/२०२३.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस सविनय कळवू इच्छितो की, संदर्भाधीन प्रादेशिक कार्यालयाच्या पत्रान्वये पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, उच्च माध्यमिक अभ्यासक्रम तसेच व्दिलक्षी अभ्यासक्रमराबविणा-या शासकिय व अशासकीय अनुदानित संस्थेमधील सहाय्यक अभियांत्रिकी अधिक्षक, सहा.अधिव्याख्याता, पुर्ण वेळ शिक्षक व पुर्ण वेळ शिक्षक (प्रात्याक्षिक) या संवर्गातील एकूण ३५ कर्मचा-यांची २१ दिवस कार्यशाळा आयोजित करण्या करीता सन २०२३-२४ करिता तरतूद वितरीत करण्यात आली आहे.

या अनुषंगाने आपल्या संस्थेमध्ये सहाय्यक अभियांत्रिकी अधिक्षक, सहा.अधिव्याख्याता, पुर्ण वेळ शिक्षक व पुर्ण वेळ शिक्षक (प्रात्याक्षिक) संवर्गातील प्रशिक्षणाकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध असल्याने पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, उच्च माध्यमिक अभ्यासक्रम तसेच ब्दिलक्षी अभ्यासक्रम राबविणऱ्या संस्थेतील एकूण ३५ शिक्षकीय कर्मचाऱ्यांचे २१ दिवसांचे सेवांतर्गत प्रशिक्षण दिनांक ०१/०१/२०२४ ते २४/०१/२०२४ (रविवार सुटटी वगळुन) या कालावधीत आयोजित करावयाचे आहे.

सदर सेवांतर्गत कार्यशाळेमध्ये प्रशिक्षणाकरीता असणा-या विषयाचा अभ्यासक्रम www.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उपरोक्त प्रशिक्षणाकरिता उच्च व तंत्र शिक्षण शासन निर्णय क्र. व्हीओसी-२०१०/प्र.क्र.३०१/व्यशि-४ दि. १२/८/२०११ नुसार प्रशिक्षण कालावधीत खालील खर्च अनुज्ञेय होतात.

१) प्रशिक्षण देणा-या तज्ञ व्यक्तीचेमानधन, त्यांचा प्रवासभत्ता व राहण्याचा खर्च .

२) प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये प्रशिक्षणार्थ्यांना देण्यात येणा-या Learning/Instruction Material तयार करण्यासाठी होणारा सर्व खर्च (उदा. छपाई/स्टेशनरी खर्च).

३) प्रशिक्षणाकरिता देण्यात येणा-या आस्थापना भेटी साठीचा खर्च.

४) कार्यशाळा, दृकश्राव्य् यंत्रणा चे अनुषंगिक खर्च (उदा. जागेचे भाडे व इतर सुविधावरील खर्च) जागेकरिता किमान भाडे आकार (बृहनमुंबई यांचे दरानुसार).

५) पुर्व व्यवसायिक अभ्यासक्रम, उच्च माध्यमिक अभ्यासक्रम आणि व्दिलक्षी अभ्यासक्रम पुस्तक छपाई व इतर Learning/Instruction Material तज्ञांचे मानधन, प्रवास खर्च व दैनंदिन भत्ता तसेच इतर कार्यालयीन खर्च

प्रशिक्षण कार्यक्रमाची उपरोक्त अ.क्र. १ ते ५ चे खर्चाची कमाल मर्यादा प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिन रु. ५००/- इतकी राहील.

आपली संस्था सदर प्रमाणे प्रस्तावित प्रशिक्षण कार्यक्रमासाठी दिनांक ०१/०१/२०२४ ते २४/०१/२०२४ या कालावधीमध्ये आयोजन करुन राबविण्यास तयार असल्यास उपरोक्त खर्चाचे मर्यादेत एकूण ३५ प्रशिक्षणार्थीकरिता २१ दिवसांसाठी किमान खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यासह प्रशिक्षण कार्यक्रमाचा आराखडा व वेळापत्रक याचे प्रस्ताव या कार्यालयास सीलबंद पाकिटात दि. ०८/१२/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत सादर करावेत. दि. ०८/१२/२०२३ रोजी सीलबंद पाकिटे सायंकाळी ०५.०० वाजता उघडण्यात येतील. उपरोक्त अ.क्र. परीच्छेद क्र ३ मधील अभ्यासक्रमांचा अंतर्भाव करुन किमान खर्चाचे अंदाजपत्रक सादर करणा-या संस्थेची प्रशिक्षण आयोजित करण्याकरिता निवड करण्यात येईल.

टिप-

१) पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, उच्च माध्यमिक अभ्यासक्रम तसेच ब्दिलक्षी अभ्यासक्रम www.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) उ. व तं. शि.विभाग शासन निर्णय दि. १२/८/२०११ सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे.

आपला विश्वासू

(एम एस जाधव)
प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण संस्था
अंबरनाथ जि ठाणे